• वर्ष : ०३ • अंक : २४६ • पुणे • गुरुवार, दि. २८ मे २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक




दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

## आपल्या जाहिरातींसाठी विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती
आता प्रसिद्ध करा दैनिक **आरंभ पर्व** मध्ये –
विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.

### आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती
- ग्रामपंचायत जाहिराती
- निविदा / टेंडर नोटीस
- जाहीर नोटीस
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना
- सहकारी संस्था जाहिराती
- शैक्षणिक संस्था सूचना
- कोर्ट / कायदेशीर नोटीस
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती

### का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी



आपला विश्वास आमची जबाबदारी

आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यंत पोहोचवण्यासाठी
## आजच संपर्क साधा!

संपर्क : प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल : aparvinfo@gmail.com

दैनिक आरंभ पर्व | “आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र”

## थोडक्यात पण महत्त्वाचे




### पुण्यात रंगला फॅशन आणि आकर्षणाचा भव्य सोहळा

पुणे (आरंभ पर्व) : शहरातील फॅशनविश्वाला ग्लॅमर आणि स्टाइलची नवी झळाळी देणारा 'रनवे हाइस्ट सीझन-२' हा भव्य सोहळा २४ मे २०२६ रोजी हिंजवडी येथील रॅडिसन ब्लू हॉटेल पुणे हिंजवडी येथे उत्साहात पार पडला. पूजा सिंह यांच्या संकल्पनेतून आणि दिवा पेजंट्सच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने पुण्यातील फॅशनप्रेमींचे विशेष लक्ष वेधून घेतले. देशभरातील ५० हून अधिक मॉडेल्सनी आकर्षक पदभ्रमण सादर करत आपल्या अदाकारीची मोहिनी उपस्थितांवर घातली. कार्यक्रमात विविध नामांकित वेशभूषाकार आणि वस्त्रसंग्रहांनी विशेष दाद मिळवली. डोर – ड्रेस ऑन रेंट, बीइंग डिझायनर सिमी, पोश, पुष्पांचल, रॉयल टास्टा तसेच प्रियांका दुबे यांच्या आकर्षक आणि आधुनिक वस्त्रसंग्रहाने उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्यात अनुपमा सिंह, रिधमा काकाणी, लता पांडे, निशा यादव, नीलू मेहता, रेखा पलाडी, आरती बोरोले, मेहर इक्बाल आणि अभिज्ञा खोबरागडे यांनी मोहक उपस्थिती दर्शवत कार्यक्रमाची रंगत अधिक वाढवली. भव्य सादरीकरण, आकर्षक पदप्रदर्शन, मान्यवरांची उपस्थिती आणि आलिशान वातावरणामुळे हा सोहळा पुण्यातील वर्षातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या कार्यक्रमांपैकी एक ठरला.

### आज 'दि केरला स्टोरी २'चा वर्ल्ड टीव्ही प्रीमियर गुरुवार




पुणे (आरंभ पर्व) : "आता ही कथा फक्त सांगितली जाणार नाही... तर ती अनुभवलीही जाणार आहे." देशभर चर्चेत राहिलेला आणि आपल्या प्रभावी कथनशैलीने प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा 'दि केरला स्टोरी 2' आता झी सिनेमावर आपल्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरसाठी सज्ज आहे. सत्य घटनांवर आधारित हा चित्रपट समाजातील एका संवेदनशील विषयावर ठाम आणि प्रभावी दृष्टिकोन मांडतो. ही रोमहर्षक आणि विचार करायला लावणारी कथा पहा ह्या गुरुवारी, 28 मे रोजी रात्री 8 वाजता फक्त झी सिनेमा वर. कामाख्या नारायण सिंग दिग्दर्शित आणि विपुल अमृतलाल शाह निर्मित या चित्रपटात उल्का गुप्ता, ऐश्वर्या ओझा, अदिती भाटिया, सुमित गहलावत, अर्जन सिंह औजला, युक्तम खोसला आणि अलका अमीन यांनी भूमिका साकारल्या आहेत. त्यांच्या दमदार अभिनयासोबतच चित्रपटाच्या प्रभावी आणि ठाम कथनशैलीमुळे तो अलीकडच्या काळातील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या चित्रपटांपैकी एक ठरला आहे. 'दि केरला स्टोरी 2' हा चित्रपट हे उलगडण्याचा प्रयत्न करतो की कसा प्रेमाचा वापर करून महिलांच्या स्वातंत्र्यावर घाला घातला जाऊ शकतो. हा चित्रपट कुटुंबांसाठी एक व्यापक इशारा देतो. हा चित्रपट भारतातील विविध राज्यांतील तीन तरुणींची कथा मांडतो, ज्या खऱ्या प्रेमाच्या शोधात आपल्या कुटुंबाविरुद्ध जातात, पण पुढे फसवणूक, विश्वासघात आणि अत्याचारांच्या जाळ्यात त्या अडकतात. काय फार उशीर व्हायच्या आधी त्या ह्या भयानक परिस्थितीतून बाहेर पडू शकतील? पाहायला विसरू नका 'दि केरला स्टोरी 2'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर ह्या गुरुवारी 28 मे रोजी रात्री 8 वाजता झी सिनेमावर!

### IMF च्या हिमालयीन सुदर्शन शिखर मोहिमेसाठी जुन्नरच्या निखिलची निवड



जुन्नर (आरंभ पर्व) : पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील युवा गिर्यारोहक निखिल किसन कोकाटे याची उत्तराखंडमधील अत्यंत आव्हानात्मक समजल्या जाणाऱ्या सुदर्शन शिखर आरोहण मोहिमेसाठी निवड करण्यात आली आहे. Indian Mountaineering Foundation (IMF) यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या राष्ट्रीय मोहिमेसाठी देशभरातील अनुभवी व निवडक गिर्यारोहकांमधून निखिलची निवड झाली असून, ही जुन्नर तालुक्यासह संपूर्ण आदिवासी व ग्रामीण भागासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. उत्तराखंडमधील गंगोत्री नॅशनल पार्क परिसरातील ६५२९ मीटर (२१,४२१ फूट) उंचीच्या सुदर्शन शिखरावर ही मोहीम पार पडणार आहे. गढवाल हिमालयातील हे शिखर तांत्रिकदृष्ट्या अत्यंत कठीण मानले जाते. १० जूनपासून सुरू होणारी ही २४ दिवसांची मोहीम ४ जुलैपर्यंत चालणार असून १० सदस्यीय संघात निखिलचा समावेश करण्यात आला आहे. निखिलने यापूर्वी Mount Kilimanjaro, युनाम, शिनकुण आणि ब्लॅक पीक यांसारख्या शिखरांवर यशस्वी चढाई केली आहे. बेसिक व ॲडव्हान्स माउंटेनिअरिंग कोर्स पूर्ण केलेला निखिल ग्रामीण व आदिवासी युवकांमध्ये गिर्यारोहणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी कार्यरत असून भविष्यात Mount Everest सर करण्याचे त्याचे स्वप्न आहे.

### कान्सच्या रेड कार्पेटवरील प्राजक्ताच्या सौंदर्याला 'निरुपा सारीज'चा साज



ठाणे (आरंभ पर्व) : यंदाच्या प्रतिष्ठित कान्स चित्रपट महोत्सवामध्ये मराठी कलाकारांनी खास मराठमोळा ठसा उमटवला. अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने कान्सच्या रेड कार्पेटवर पारंपरिक नऊवारी साडीत केलेल्या आकर्षक एन्ट्रीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विशेष म्हणजे, तिच्या या चर्चित लूकला ठाण्यातील निरुपाज येवला पैठणी अँड सिल्क सारीजच्या खास साडीचा साज लाभला होता. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर आणि मनोरंजनविश्वात प्राजक्ताच्या या लूकची मोठ्या प्रमाणात चर्चा रंगली आहे. मोरपिशी छटेतील नऊवारी, त्यावर भरजरी शेला, पारंपरिक नथ, ठुशी, कमरपट्टा आणि मराठमोळा दागिन्यांचा साज अशा संपूर्ण लूकमधून तिने महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख जागतिक मंचावर अभिमानाने सादर केली. कान्सच्या रेड कार्पेटवर सहसा वेस्टर्न गाऊन्स आणि ग्लॅमरस फॅशन पाहायला मिळते. मात्र, प्राजक्ताने भारतीय परंपरा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाला प्राधान्य देत नऊवारीची निवड केल्याने तिचा लूक सर्वांपेक्षा वेगळा आणि उठून दिसणारा ठरला. फॅशनप्रेमींसह मराठी प्रेक्षकांनीही तिच्या या निर्णयाचे भरभरून कौतुक केले आहे. 'निरुपा सारीज'ने तयार केलेल्या या साडीमध्ये पारंपरिक विणकाम, आकर्षक रंगसंगती आणि आधुनिक एलिगन्स यांचा सुंदर मिलाफ पाहायला मिळाला. मराठमोळ्या साड्यांची समृद्ध परंपरा जागतिक स्तरावर पोहोचवण्याचे काम या निमित्ताने झाले असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

# एकदिवसीय रमाई साहित्य संमेलनाचे ३० मे रोजी आयोजन

## संमेलनाच्या अध्यक्षपदी रमणी सोनवणे यांची निवड




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महामाता रमाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीने महामाता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृतिदिनानिमित्त तसेच स्मारकाच्या ८ व्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी एकदिवसीय 'रमाई साहित्य संमेलन' आयोजित करण्यात आले असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी विद्रोही कवयित्री,लेखिका, व्याख्याती,अभिनेत्री रमणी सोनवणे यांची निवड करण्यात आल्याची माहिती या संमेलनाचे मुख्य समन्वयक विठ्ठल गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी ॲड. नितीन घोडके, ॲड. क्षितिज खरात, संजोग कांबळे, माजी नगरसेविका लाताताई राजगुरू, श्रीमंत कोतले आदि मान्यवर उपस्थित होते.

संमेलनाची अधिक माहिती देताना विठ्ठल गायकवाड म्हणाले, कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाई आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून होईल. त्यानंतर सर्वधर्म प्रतिनिधींच्या उपस्थितीत वाडिया कॉलेज शेजारील रमाई राष्ट्रीय स्मारक येथे उद्घाटन समारंभ पार पडणार आहे.

सकाळी 'मी राजगृहातील रमाई बोलते' हा एकपात्री कार्यक्रम सादर करण्यात येणार असून प्रा. रमणी सोनवणे (पुणे) या कार्यक्रमाचे सादरीकरण करणार आहेत.


दुपारच्या सत्रात रमाई आणि भीमराव यांच्या लेकरांचे कवी संमेलन होणार आहे. यामध्ये लोककवी भगवान धेंडे व इतर कवी सहभागी होणार आहेत.

सायंकाळच्या सत्रात साहित्य संमेलनाध्यक्ष प्रा. रमणी सोनवणे यांचे अध्यक्षीय भाषण, ठराव वाचन, विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गुणगौरव, तसेच 'आम्ही भारताचे लोक आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ' यांच्या वतीने कविता, गझल व गीत गायनाचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. स्वरांजली संगीत समूहाकडूनही विशेष गीत-संगीत रजनी सादर होणार आहे.

पहिल्या रमाई साहित्य संमेलन अध्यक्षपदी निवड झालेल्या प्रा.रमणी सोनवणे या विद्रोही कवयित्री, लेखिका, व्याख्याती, अभिनेत्री, माणूसपणाच्या समतावादी चळवळीच्या कार्यकर्ती आहेत. त्यांचे शिक्षण एम. ए. नेट पॉलिटिकल सायन्स असून सध्या त्या मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स येथे कार्यरत आहेत. वयाच्या १६ व्या वर्षांपासून चळवळीत अभिनय, लेखन, कवितांच्या माध्यमातून मनपरिवर्तन आणि महामाता, महापुरुष सर्व समाज स्तरांपर्यंत पोहचवण्याचे काम करत आहेत. सावित्रीबाई फुले, होय मी राजगृहातील रमाई बोलतेय, मी तुमची राजमाता जिजाऊ आदि एकपात्रीचे त्या सादरीकरण करत असतात. गोरगरीब मुलांसाठी मोफत शिकवणी, स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना मराठी, राज्यशास्त्र व आंतरराष्ट्रीय राजकारण आणि समाजशास्त्र या विषयांचे मार्गदर्शन त्या करत असतात असेही गायकवाड यांनी सांगितले.

## एक्स्पोमधून उलगडणार भारताच्या 'ऑरेंज इकॉनॉमी'चे भवितव्य

३० व ३१ मे रोजी पुण्यातील गणेश कला क्रीडा मंच येथे भव्य आयोजन; देश-विदेशातील नामांकित कंपन्यांचा सहभाग




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये आता पारंपरिक उद्योगांच्या जोडीला सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि डिजिटल कौशल्य यांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. मानवी मेंदूतील कल्पनाशक्तीवर आधारित 'ऑरेंज इकॉनॉमी' अथवा 'क्रिएटिव्ह इकॉनॉमी' ही भारताच्या आर्थिक प्रगतीची नवी दिशा ठरत असून त्याच संकल्पनेवर आधारित 'क्रिएटिव्ह इंजिन एक्स्पो २०२६'चे आयोजन येत्या ३० आणि ३१ मे रोजी गणेश कला क्रीडा मंच,पुणे येथे करण्यात आले आहे. अशी माहिती मुख्य आयोजक सृजन कॉलेज ऑफ डिझाईन चे संस्थापक संतोष रासकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुणे श्रमिक पत्रकार भवन येथे झालेल्या परिषदेला आयआयसीटीचे संचालक आशिष कुलकर्णी, प्रशांत महाडीक - डायरेक्टर, शारदा बिझनेस सोल्यूशन प्रा लि., निखिल हळ्ळी डायरेक्टर अरेना, विनीता बच्छानी - डायरेक्टर मोशन पिक्चर्स स्कूल आदी मान्यवर उपस्थित होते.

एक्स्पो विषयी अधिक माहिती देताना संतोष रासकर म्हणाले, हा एक्स्पो केवळ कला, ॲनिमेशन किंवा तंत्रज्ञानाचा मेळावा नसून भारतातील भविष्यातील अब्जावधी रुपयांच्या क्रिएटिव्ह अर्थकारणाची झलक ठरणार आहे. असल्याचे आयोजकांनी सांगितले . जगभरात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल आणि क्रिएटिव्ह क्षेत्रामुळे रोजगार, गुंतवणूक आणि आर्थिक विकासासाठी नवे मार्ग खुले होत आहेत. यामुळे भारतासारख्या विकसनशील देशाला जागतिक स्तरावर मोठी संधी निर्माण झाली आहे. सध्या जागतिक स्तरावर 'ऑरेंज इकॉनॉमी'चा वाटा GDP मध्ये सातत्याने वाढत असून ॲनिमेशन, गेमिंग, VFX, डिजिटल डिझाईन, व्हर्च्युअल रिॲलिटी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित क्रिएटिव्ह सोल्यूशन्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये मोठी आर्थिक उलाढाल होत आहे. केंद्र सरकारनेही डिजिटल आर्ट आणि क्रिएटिव्ह इंडस्ट्रीला राष्ट्रीय आर्थिक प्रगतीचा महत्त्वपूर्ण घटक म्हणून मान्यता दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला जागतिक 'क्रिएटिव्ह इकॉनॉमी'चे केंद्र बनवण्याचे व्हिजन मांडले असून त्यासाठी विविध धोरणात्मक पावले उचलली जात आहेत. आयआयसीटी चे डायरेक्टर आशीष कुलकर्णी यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेला 'पुणे-मुंबई AVGC-XR कॉरिडॉर' हा या क्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. AVGC-XR म्हणजे Animation, Visual Effects, Gaming, Comics आणि Extended Reality या क्षेत्रांचा समावेश असलेला हा कॉरिडॉर पुणे आणि मुंबई या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडून सर्जनशील उद्योगांचे नवे केंद्र निर्माण करणार आहे. शिक्षण, संस्कृती आणि तंत्रज्ञानाचा मजबूत पाया असलेल्या पुणे शहराला यामुळे देशाचे 'क्रिएटिव्ह कॅपिटल' बनण्याची मोठी संधी मिळणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## संवर्धन आणि विकासाच्या नावाखाली अनागोंदी



- रायगड विकास प्राधिकरण बरखास्तीची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी आणि हिंदुस्थानच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या किल्ले रायगडाच्या संवर्धन आणि विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत आहे.

गेल्या ९ वर्षांत सुमारे ६०३ कोटी रुपयांचा निधी मंजूर असूनही आजही गडावर समाधानकारक काम दिसत नसून अपेक्षित कामे पूर्ण झालेली नसल्याचा आरोप शिवरायांच्या सैन्यातील पायदळप्रमुख सरनोबत पिलाजी गोळे यांचे वंशज लौकिक गोळे व ॲड. अर्चना मारणे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केला. रायगड विकास प्राधिकरण तात्काळ बरखास्त करण्याची मागणी यावेळी रायगड बचाव समितीच्या वतीने करण्यात आली. याबाबत सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी गेल्या रविवारी (२४ मे) 'रायगड वाचवा' अभियानांतर्गत पुण्यात भव्य दुचाकी फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी संताप व्यक्त करतांना गोळे म्हणाले की, शिवभक्त, इतिहासप्रेमी, सरदार घराण्यातील काही वंशज आणि स्थानिक नागरिकांकडून या भ्रष्ट कारभाराबाबत सातत्याने आवाज उठविण्यात येत असूनही रायगड विकास प्राधिकरण याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे.

## मॅरिकोचा केस स्वच्छता क्षेत्रात दमदार प्रवेश




- 'पॅराशूट प्रगत प्रथिन शाम्पू'सह नवकल्पनाधारित विकास धोरणाला बळ

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीच्या दैनंदिन वापराच्या वस्तू निर्माण करणाऱ्या कंपन्यांपैकी एक असलेल्या मॅरिकोने 'पॅराशूट प्रगत प्रथिन शाम्पू'च्या माध्यमातून केस स्वच्छता विभागात प्रवेश केला आहे. नारळ आणि नैसर्गिक घटकांच्या गुणधर्मांनी समृद्ध असलेली ही नवी उत्पादन श्रेणी कंपनीचे केस निगा क्षेत्रातील स्थान अधिक मजबूत करणार असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

कंपनीचे भारत मुख्य व्यवसाय विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष गोपाल म्हणाले, "पॅराशूट प्रगत नारळाच्या गुणधर्मांसह केस स्वच्छतेसाठीचे हे उत्पादन सादर करणे हा आमच्या उत्पादन विस्तारातील महत्त्वाचा टप्पा आहे. नैसर्गिक उत्पादनांसाठी ग्राहकांची वाढती मागणी लक्षात घेऊन हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. भारतातील वैयक्तिक निगा क्षेत्राचे मूल्य दहा हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक असून या क्षेत्रात नऊ ते दहा टक्क्यांनी वाढ होत आहे. या नव्या उत्पादनामुळे कंपनीला मोठ्या प्रमाणात वाढीच्या संधी उपलब्ध होतील."

कंपनीचे भारत विभागाचे प्रमुख विपणन अधिकारी विक्रम करवाल यांनी सांगितले की, ग्राहक आता अधिकाधिक नैसर्गिक आणि विश्वासार्ह उत्पादनांकडे वळत आहेत. "भारतीय ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या उत्पादनाचा प्रचार दूरचित्रवाणी, संगणकीय माध्यमे, निर्माते सहकार्य आणि प्रादेशिक माध्यमांतून केला जाणार आहे," असे त्यांनी नमूद केले. नवीन पॅराशूट प्रगत प्रथिन शाम्पू श्रेणीत नारळ, कोरफड, रोझमेरी, आवळा, शिकेकाई आणि बदाम यांसारख्या नैसर्गिक घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

## नितीन गोसावी व राहुल पाटील यांच्यावर मोठी जबाबदारी!

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या जळगाव ग्रामीणमध्ये नवनियुक्त्या



**मुक्ताईनगर (दै. आरंभ पर्व)**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी आणि पक्षाचा विस्तार तळागाळापर्यंत करण्यासाठी जिल्हाप्रमुखांच्या आदेशाने नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशानुसार, तसेच उपनेते व संपर्कप्रमुख श्री. गुलाबरावजी वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडी करण्यात आल्या आहेत. पक्षाची ध्येयधोरणे आणि विचार सामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने या नियुक्त्या महत्त्वपूर्ण मानल्या जात आहेत.

नवनियुक्त पदाधिकारी पुढीलप्रमाणे : श्री. नितीन बळीराम गोसावी – विधानसभा क्षेत्रप्रमुख तथा विधानसभा संघटक

ॲड. राहुल अशोक पाटील – मुक्ताईनगर तालुकाप्रमुख दोन्ही नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या आजवरच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची आणि पक्षनिष्ठेची दखल घेऊन जिल्हाप्रमुखांच्या आदेशाने त्यांना ही नवीन जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

"नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेचे विचार तळागाळातील प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवावेत. सामान्य जनतेचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी सदैव तत्पर राहावे आणि आगामी काळात पक्ष संघटना अधिक मजबूत व गतिमान करावी," अशा सदिच्छा यावेळी ज्येष्ठ नेत्यांनी व पक्षाच्या वतीने व्यक्त केल्या. या निवडींबद्दल नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर राजकीय व सामाजिक स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# देशाला स्वच्छ भारताची नव्हे, तर सत्य भारताची गरज



**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देश बदलतो आहे, व्यवस्था बदलते आहे, तंत्रज्ञान बदलते आहे, पण एक प्रश्न मात्र अधिक गडद होत चालला आहे. सत्य बोलण्याचे धाडस अजून जिवंत आहे का? लोकशाहीमध्ये सत्ता बदलत राहते, पक्ष बदलतात, चेहरे बदलतात; पण लोकशाहीचा खरा आत्मा जिवंत ठेवण्याचे काम पत्रकारिता करत असते. कारण पत्रकार हा फक्त बातमी देणारा माणूस नसतो, तर समाजाचा आरसा असतो. तो सत्तेला प्रश्न विचारतो, जनतेचा आवाज बनतो आणि अन्यायाविरुद्ध उभा राहतो. मात्र आज देशात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की अनेक माध्यमसंस्था सत्तेच्या दावणीला बांधल्या गेल्याची भावना सामान्य माणसाच्या मनात निर्माण झाली आहे. पूर्वी पत्रकारितेमध्ये विचारांची लढाई होती. संपादक आणि पत्रकार सत्तेच्या विरोधात उभे राहत होते. सरकार चुकीचे असेल तर त्याला उघडपणे प्रश्न विचारले जात होते. भ्रष्टाचार, अन्याय, शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी, महागाई, प्रशासनातील अपयश. या सगळ्या विषयांवर माध्यमे आक्रमकपणे बोलत होती. पण आता चित्र बदलले आहे. आज अनेक वृत्तवाहिन्या आणि वर्तमानपत्रे सत्तेच्या जवळ गेल्याचे दिसते. सत्ताधाऱ्यांचे समर्थन, विरोधकांची बदनामी आणि जनतेचे खरे प्रश्न बाजूला ठेवणे, हा प्रकार वाढताना दिसतो आहे. जाहिराती, आर्थिक व्यवहार आणि राजकीय दबाव यांच्या माध्यमातून माध्यमांवर प्रभाव टाकला जात असल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे.

याचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे लोकशाही कमकुवत होऊ लागते. कारण जेव्हा पत्रकार प्रश्न विचारणे थांबवतात, तेव्हा सत्ताधाऱ्यांची भीती संपते. लोकशाहीमध्ये विरोधी आवाज जिवंत राहणे आवश्यक असते. पत्रकारिता जर सत्तेची स्तुती करण्यातच गुंतली, तर सामान्य माणसाचा आवाज कोण उठवणार? शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगार तरुणांची निराशा, महागाईने त्रस्त कुटुंबे, अन्यायग्रस्त समाजघटक. यांचे प्रश्न कोण मांडणार? म्हणूनच आज देशाला फक्त "स्वच्छ भारत" नव्हे, तर "सत्य भारत" घडवण्याची गरज आहे. स्वच्छता फक्त रस्त्यांची नसते; विचारांची, व्यवस्थेची आणि सत्याचीही असते. समाजात खोटेपणा, दिशाभूल आणि भीती वाढली तर बाहेरून कितीही विकास झाला तरी लोकशाही आतून पोकळ होत जाते. आज समाजमाध्यमांच्या काळात खोटी माहिती काही क्षणांत लाखो लोकांपर्यंत पोहोचते. अफवा, द्वेष आणि अर्धसत्य यामुळे समाजामध्ये तणाव वाढतो. अशा वेळी पत्रकारितेची जबाबदारी अधिक मोठी बनते. सत्य पडताळून लोकांसमोर ठेवणे, सत्तेची चौकशी करणे आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देणे, हे माध्यमांचे कर्तव्य आहे.

तरीही या काळोखात आशेचा किरण पूर्णपणे विझलेला नाही. आजही अनेक पत्रकार सत्याच्या बाजूने ठामपणे उभे आहेत. धमक्या, खटले, नोकरी जाण्याची भीती, आर्थिक दबाव आणि समाजमाध्यमांवरील अपमान यांचा सामना करूनही अनेक पत्रकार लोकांचे प्रश्न मांडत आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार, दलित, आदिवासी, महिलांवरील अत्याचार, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार यांसारख्या विषयांवर आजही काही पत्रकार प्रामाणिकपणे काम करताना दिसतात. हेच लोकशाहीचे खरे रक्षक आहेत.

> आज गरज आहे ती भीतीमुक्त पत्रकारितेची. सत्य मांडणाऱ्या पत्रकारांच्या पाठीशी समाजाने उभे राहिले पाहिजे. माध्यमे जर फक्त सत्तेचे गुणगान गात राहिली, तर लोकशाहीचा आत्माच हरवेल. म्हणूनच आज देशाला रस्त्यांची नव्हे, तर विचारांची स्वच्छता हवी आहे. खोटेपणाच्या धुरात हरवलेल्या व्यवस्थेला सत्याचा आरसा दाखवण्याची वेळ आली आहे. देशाला स्वच्छ भारतापेक्षा सत्य भारताची अधिक गरज आहे. कारण सत्य जिवंत असेल, तरच लोकशाही जिवंत राहील.

इतिहास साक्षी आहे की सत्याला कायम दाबून ठेवता येत नाही. आणीबाणीच्या काळातही काही पत्रकार आणि विचारवंत झुकले नाहीत. त्यांनी तुरुंगवास सहन केला, पण सत्य बोलणे सोडले नाही. आज परिस्थिती वेगळी असली तरी संघर्ष तोच आहे. सत्य आणि सत्तेचा संघर्ष. फरक इतकाच की आता भीती अधिक सूक्ष्म झाली आहे. थेट बंदीपेक्षा आर्थिक दबाव, सामाजिक बहिष्कार आणि खोट्या प्रचाराच्या माध्यमातून आवाज दाबला जातो. पण तरीही काही पत्रकार अजूनही जनतेच्या बाजूने उभे आहेत, ही लोकशाहीसाठी दिलासादायक बाब आहे.

लोकशाही केवळ निवडणुकांवर टिकत नाही; ती प्रश्न विचारणाऱ्या समाजावर टिकते. पत्रकारितेचे काम सरकारची जाहिरात करणे नसून सरकारला जाब विचारणे आहे. सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणारा पत्रकार देशद्रोही नसतो; उलट तोच लोकशाहीचा खरा पहारेकरी असतो. कारण जेव्हा प्रश्न विचारणे थांबते, तेव्हा हुकूमशाहीची सुरुवात होते.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. २८ मे २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे




### ड्रीमे टेक्नॉलॉजीसोबत ख्रिस्तियानो रोनाल्डोची नवी जागतिक भागीदारी

नवी दिल्ली (आरंभ पर्व) : नाविन्यपूर्ण गृहउपकरणे आणि उत्कृष्ट घरगुती उपाय क्षेत्रातील जागतिक अग्रणी असलेल्या ड्रीमे टेक्नॉलॉजीने, आज फुटबॉल क्षेत्रातील दिग्गज खळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डोसोबत एका ऐतिहासिक जागतिक भागीदारीची घोषणा केली. हे सहकार्य कंपनीच्या वाटचालीतील एक निर्णायक टप्पा ठरले असून, ज्यामध्ये जगातील सर्वात शिस्तबद्ध खेळाडूंपैकी एकाला तंत्रज्ञानातील परिपूर्णतेचा आणि गुणवत्तेतील सर्वोच्चतेचा सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या ब्रँडशी एकत्र आणले जाते. ही नियुक्ती, ड्रीमे च्या जागतिक ब्रँड उपस्थितीच्या धोरणात्मक उंचावण्याचे प्रतीक असून, ती कंपनीच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सध्याच्या परिपक्वतेचे प्रतिबिंब आहे. जलद विस्तार आणि उच्च-गती मोटर तंत्रज्ञान व एआय-आधारित प्रणालींमधील सातत्यपूर्ण प्रगतीची अनेक वर्षे लोटल्यानंतर, ड्रीमे ने जागतिक स्तरावर एक आदर्श म्हणून आपले स्थान भक्कम केले आहे; आणि आता या प्रतिष्ठित भागीदारीमुळे त्यांचे हे स्थान अधिकच दृढ झाले आहे. ड्रीमे च्या विकासाचा हा एक स्वाभाविक परिपाक असून, उच्च-दर्जाच्या गृहउपयोगी उपकरणांच्या बाजारपेठेत खऱ्या अर्थाने जागतिक स्तरावर नेतृत्व करण्यास आपण सज्ज आहोत, याचाच हा एक संकेत आहे.

### पुण्यातील विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये चमकदार कामगिरी

पुणे (आरंभ पर्व) : विज्ञान ऑलिम्पियाड फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या ऑलिम्पियाड स्पर्धांपैकी एक असलेल्या एसओएफ ऑलिम्पियाड २०२५-२६ मध्ये पुण्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. विविध विषयांच्या स्पर्धांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवत विद्यार्थ्यांनी शहराचा नावलौकिक वाढविला आहे. भारती विद्यापीठ रवींद्रनाथ टागोर उत्कृष्टता विद्यालयातील इयत्ता दहावीचा विद्यार्थी आर्य वैभव कुलकर्णी याने आंतरराष्ट्रीय इंग्रजी ऑलिम्पियाडमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले. तसेच एसएनबीपी आंतरराष्ट्रीय विद्यालयातील इयत्ता अकरावीचा विद्यार्थी देव सक्सेना याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विशेष यश संपादन केले. विबग्योर उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सहावीचा विद्यार्थी अर्जुन डोंगस्वार याने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले, तर अक्षरा आंतरराष्ट्रीय विद्यालयातील इयत्ता आठवीचा विद्यार्थी अरमान गुहा याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विशेष यश मिळवले. सर्व विद्यार्थ्यांना सुवर्णपदके, प्रमाणपत्रे आणि विशेष प्रावीण्य गौरवपत्र प्रदान करण्यात आले.

### ग्रामीण महाराष्ट्रात इंडियन ऑइलकडून इंधन पुरवठा सुनिश्चित

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये हंगामी स्वरूपात इंधनाच्या मागणीत होत असलेल्या वाढीदरम्यान इंडियनऑइलकडून पेट्रोल (एमएस),डिझेल (एचएसडी) आणि एलपीजीचा सुरळीत व अखंड पुरवठा कायम ठेवण्यात येत आहे. अलिकडच्या काही दिवसांत महाराष्ट्रभर पेट्रोलियम उत्पादनांच्या उठावामध्ये इंडियनऑइलने लक्षणीय वाढ नोंदवली आहे. 1 ते 25 मे 2026 या कालावधीत पेट्रोल (एमएस) रिटेल विक्रीमध्ये वर्षानुवर्षे 22 टक्के वाढ नोंदवली गेली असून, त्याच कालावधीत डिझेल (एचएसडी) रिटेल विक्रीमध्ये 33 टक्क्यांची वाढ झाली आहे, जी वाढलेल्या हंगामी मागणीचे प्रतिबिंब आहे. सध्या डिझेलच्या मागणीत होत असलेली वाढ प्रामुख्याने महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रांमध्ये सुरू असलेल्या शेतीविषयक कामांमुळे आहे, जिथे शेतकरी आगामी पेरणी हंगामासाठी शेतांची तयारी करत आहेत. कृषी तसेच घरगुती गरजांसाठी अखंड इंधन उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी इंडियनऑइलकडून लॉजिस्टिक्स आणि पुरवठा व्यवस्थापनाचे काटेकोर समन्वय करण्यात येत आहे. नागपूर,जालना,बुलढाणा,अकोला,वाशीम आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतील शेतकरी आणि ग्राहकांनी इंडियनऑइलच्या रिटेल आऊटलेट्सवर डिझेलची सुरळीत उपलब्धता आणि अखंड सेवांबाबत सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत.

### भारती एअरटेलने डीओटी पॅनेलसमोर प्रायोरिटी पोस्टपेड'सेवेचे समर्थन केले




नवी दिल्ली (आरंभ पर्व) : भारती एअरटेलने दूरसंचार विभागाच्या (डीओटी) पॅनेलसमोर आपल्या नव्या "प्रायोरिटी पोस्टपेड" सेवेचे समर्थन करताना सांगितले की, 5जी नेटवर्क स्लायसिंग तंत्रज्ञानावर आधारित ही सेवा नेट न्यूट्रॅलिटीच्या नियमांचे उल्लंघन करत नाही तसेच प्रीपेड ग्राहकांच्या सेवेच्या गुणवत्तेत कोणतीही घसरण होत नाही. दूरसंचार आणि माहिती तंत्रज्ञान समितीने मागवलेल्या स्पष्टीकरणाला उत्तर देताना एअरटेलने सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 5जीच्या मुख्य वैशिष्ट्यांचा वापर करून सेवा देण्यास परवानगी न दिल्यास देशातील 6जीच्या क्षमतेला धोका निर्माण होईल. "प्रायोरिटी पोस्टपेड ही सेवा कंटेंट-न्यूट्रल पद्धतीने कार्यान्वित करण्यात आली असून ती ट्राय आणि डीओटीच्या विद्यमान नियमावलीशी पूर्णपणे सुसंगत आहे. कोणत्याही ॲप्लिकेशनसाठी ब्लॉकिंग, थ्रॉटलिंग, कंटेंट-विशिष्ट प्राधान्य, झिरो-रेटिंग किंवा विशेष वागणूक दिली जात नाही," असे एअरटेलने म्हटले.

### जागतिक परिस्थिती बदलली तरी भारताची गती कायम

मुंबई (आरंभ पर्व) : इंडियनऑइल महाराष्ट्र राज्यभर अखंड संचालन आणि लॉजिस्टिक्स समन्वय सुनिश्चित करत असून प्रत्येक ग्राहकासाठी दररोज पेट्रोल (MS), डिझेल (HSD) आणि एलपीजीची अखंड उपलब्धता कायम ठेवत आहे. भारतामधील नागरिकांच्या प्रत्येक सामान्य दिवसामागे सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांची (PSU OMCs) 24X7 असामान्य तयारी कार्यरत असते आणि वाढीची आकडेवारी याचीच साक्ष देते. महाराष्ट्रात मे 2026 दरम्यान मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत पेट्रोल (MS) किरकोळ विक्रीत 22% वाढ नोंदविण्यात आली आहे, तर डिझेल (HSD) किरकोळ विक्रीत 33% ची मजबूत वाढ झाली आहे. इतर पुरवठादारांच्या तुलनेत असलेल्या किंमत फरकामुळे संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहक इंडियनऑइल रिटेल आउटलेट्सकडे वळत असून तसेच हंगामी शेतीविषयक कामकाजामुळे मागणीत वाढ होत आहे. भारताच्या अखंड गतिमानतेमागे एक असे नेटवर्क कार्यरत आहे जे कधीही थांबत नाही. शेतांपासून महामार्गांपर्यंत,डोंगराळ भागांपासून किनारपट्टीपर्यंत, दुर्गम प्रदेशांपासून आव्हानात्मक सीमांपर्यंत, अनिश्चित जागतिक परिस्थितीतही इंडियनऑइल अखंड इंधन पुरवठा सुनिश्चित करत आहे.

# एमआयटी डब्ल्यूपीयूचा अद्वितीय उपक्रम

## स्टार्टअपसाठी ई-मोबिलिटी सेंटर ऑफ एक्सलन्स सेंटर माइलस्टोन

## इलेक्ट्रिक वाहन उद्योग, प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी यशस्वी उपक्रम



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीमध्ये स्थापन केलेल्या सेंटर फॉर एक्सलेन्स इलेक्ट्रिक व्हेकल्सचे माध्यमातून इलेक्ट्रिक वाहने आणि संबंधीत तंत्रज्ञानाच्या क्षेत्राला परिपूर्ण करण्यासाठी संशोधन, विकास, कौशल्य विकास यावर अधिक भर दिला जात आहे. तसेच टीबीआय सेंटर मध्ये३ यशस्वी स्टार्टअप, ४५ वेगवेगळ्या स्टार्टअप वर कार्य सुरू आहे. ज्यांना यशस्वीरित्या स्वतःचे स्टार्टअप सुरू करावयाचे आहे, त्यांच्यासाठी हे सेंटर सर्वतोपरी मदत करेल. अशी माहिती माईर्स एमआयटीचे संस्थापक व सेंटर फॉर एक्सलेन्स इलेक्ट्रीक व्हेइकल्सचे संचालक प्रा. प्रकाश जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी एमआयटी टीबीआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद गोरे, ईॲण्डटीसीच्या विभाग प्रमुख प्रा.डॉ. पारुल जाधव व सहयोगी प्राध्यापक डॉ. साकेत येवलेकर उपस्थित होते.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विभागाच्या माध्यमातून या सेंटरमध्ये कार्य केले जात आहे. शैक्षणिक ज्ञान आणि वेगाने विकसित होणाऱ्या इलेक्ट्रिक वाहन उद्योग यांच्यातील दरी भरुन काढणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश्य आहे. तसेच उद्योग व शैक्षणिक संस्थामधील सहकार्याला प्रोत्साहन देणे आणि ईव्ही तंत्रज्ञानाबद्दल जागरुकता वाढवावी लागेल असे ही प्रा. जोशी यांनी सांगितली.

डॉ. पारुल जाधव म्हणाल्या, सेंटरच्या माध्यमातून प्रकल्प विकास, सहयोगी संशोधन, करिअर कौन्सिलिंग, विद्यार्थी आणि प्राध्यपकांचे प्रशिक्षण, उदयोगांशी सल्लामसलत, स्टार्टअप सहाय्य आणि ईव्ही क्षेत्रात संशोधन आणि विकासावर विशेष कार्य केले जात आहे. नव्या युगात आयसी इंजिनाबरोबरच इलेक्ट्रिक कार झपाट्याने वाढतांना दिसत आहेत. भविष्यात हायब्रीड व्हेइकल्स, इलेक्ट्रिक कार आणि हायड्रोजन कार असे अनेक पर्याय इलेक्ट्रिक कार मध्ये उपलब्ध होतील. लवकरच हे सेक्टर फार मोठा पल्ला गाठणार आहे. या सर्व उद्योगाला मदत करणारे एमआयटी डब्ल्यूपीयू येथील ई मोबिलिटी सेंटर फॉर एक्सलन्स हे आहे.

> प्रसाद गोरे यांनी सांगितले की, या एमआयटी टीबीआय सेंटरच्या माध्यमातून जवळपास ७५ स्टार्टअपला सपोर्ट करण्यात आला आहे. तसेच शिक्षण, कृषी, स्पेस, आयटी या क्षेत्राशी स्टार्टअप सुरू करण्याला मदत केली जाणार आहे. ज्यांना उद्योजक व्हावयाचे आहे त्यांना प्रोत्साहन दिले जाईल. येथे लॅबटेस्टींग आणि तज्ज्ञ सल्लागार उपलब्ध आहेत. डॉ. साकेत येवलेकर म्हणाले, उद्योग क्षेत्रातील वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा आणि व्यावहारिक प्रशिक्षण उपलब्ध करुन देणे, प्रशिक्षण सत्रे, कार्यशाळा, इंटर्नशिप, परिसंवाद आणि तज्ज्ञांचे व्याख्यान यांसारखे विशेष कार्यक्रमांद्वारे विद्यार्थी व उद्योग व्यावसायिकांना इलेक्ट्रिक मोबिलिटीमधील नाविन्यपूर्ण अद्ययावत ज्ञान व कौशल्ये प्रदान केली जात आहेत. या सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थी आणि संशोधकांना नाविन्यपूर्ण एक प्रणाली शोधण्यास, डिझाइन करण्यास आणि विकसित करण्यास प्रोत्साहित केले जाते. इलेक्ट्रिक मोबिलिटी ही केवळ वाहतुकीची भविष्यातील दिशा नाही तर आजची गरज आहे.

## एमजी मॅजेस्टर 4x2 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम ₹40.99 लाख



**गुरुग्राम (दै. आरंभ पर्व)**

JSW MG मोटर इंडियाने आज बहुप्रतिक्षित MG MAJESTOR, भारतातील पहिली D+ SUV लॉन्च करण्याची घोषणा केली. ज्या ग्राहकांना त्यांच्या पुढील SUV कडून अधिक अपेक्षा आहेत, त्यांच्यासाठी डिझाइन केलेली MAJESTOR, रस्त्यावर प्रभावी उपस्थिती, प्रगत अभियांत्रिकी आणि उत्कृष्ट सर्व-भूभाग क्षमता यांचा मिलाफ आहे. एमजी मॅजेस्टर 4x2 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम INR 40.99 लाख (एक्स-शोरूम किंमत) (६ आणि ७-सीटर)एमजी मॅजेस्टर 4x4 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम INR 44.99 लाख (एक्स-शोरूम किंमत) रुपयांना लॉन्च करण्यात आली आहे. या लॉन्चवर भाष्य करताना, जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक, अनुराग मेहरोत्रा म्हणाले, "एमजी मॅजेस्टर ही भारतातील पहिली D+ एसयूव्ही असून, ती आमच्या पोर्टफोलिओमध्ये एक मोठे परिवर्तन घडवते. ही गाडी उत्कृष्ट कामगिरी, प्रीमियम आराम, प्रगत तंत्रज्ञान आणि अतुलनीय विश्वासार्हता यांचा शक्तिशाली मिलाफ सादर करते. तिच्या अतुलनीय आकारमानामुळे, ऑफ-रोडवरील प्रभुत्वामुळे आणि अनेक सेगमेंट-फर्स्ट वैशिष्ट्यांमुळे, मॅजेस्टर नवीन मापदंड स्थापित करते आणि भारतीय एसयूव्ही क्षेत्रात एक खरोखरच वेगळे मूल्य प्रदान करते." मॅजेस्टरची रचना खऱ्या एसयूव्ही कामगिरीसाठी केली आहे. तिचे ट्विन-टर्बो डिझेल इंजिन 2WD आणि प्रगत 4WD या दोन्ही प्रकारांमध्ये 8-स्पीड ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसह जोडलेले असून, ते आपल्या वर्गात सर्वोत्तम 215.5 PS आणि 478.5 Nm टॉर्क देते. इंटेलिजेंट 4WD सिस्टीममध्ये 10 ऑफ-रोड मोड्स आहेत, जे दैनंदिन कार्यक्षमता आणि मजबूत क्षमतेमध्ये सहजपणे संतुलन साधतात.

## 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६'चा दिमाखात समारोप

### बंपर लकी ड्रॉमध्ये सासवडच्या शेतकऱ्याला ट्रॅक्टर; शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**सासवड (दै. आरंभ पर्व)**

स्व. चंदुकाका जगताप यांनी स्थापन केलेल्या शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने सासवड येथील शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६'चा रविवारी (दि. २५ मे) उत्साहपूर्ण वातावरणात दिमाखदार समारोप झाला. चार दिवस चाललेल्या या कृषी प्रदर्शनाला पुणे जिल्ह्यासह राज्यभरातील हजारो शेतकरी, युवक आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली.

या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या 'बंपर लकी ड्रॉ'मध्ये सासवड येथील शेतकरी राजेश वसंत जगताप यांना ट्रॅक्टरचे बक्षीस मिळाले. दुसऱ्या क्रमांकाचे पावर ट्रीलर हे बक्षीस माळेगाव बु. (ता. बारामती) येथील सुरेश पांडुरंग चव्हाण यांनी जिंकले, तर तृतीय क्रमांकाचे पावर विडर हे बक्षीस सुनील ज्ञानोबा खटाटे यांना प्रदान करण्यात आले. याशिवाय चौथ्या दिवशीही विविध शंभर बक्षिसांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

समारोपप्रसंगी सहायक निबंधक सहकारी संस्था (पुणे जिल्हा) प्रकाश जगताप, अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, समरादित्य जगताप, रमणिकलाल कोठडिया, अशोक वणवे, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, अजय इंगळे, कात्रज डेअरीचे उपाध्यक्ष तानाजी जगताप, निरा बाजार समितीचे सभापती संदीप फडतरे, लिना गायकवाड, सुनिता कोलते आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रदर्शनामध्ये आधुनिक कृषी औजारे, प्रगत बियाणे, विविध शेतीविषयक माहिती मिळावी, नव्या तंत्रज्ञानाची ओळख व्हावी आणि कृषी क्षेत्रात नव्या संधी निर्माण व्हाव्यात, हा उद्देश या प्रदर्शनामागे होता.

यासोबतच कुटुंबासह येणाऱ्या नागरिकांसाठी मनोरंजनाची आणि लहान मुलांसाठी खेळण्यांची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे प्रदर्शनाला कृषी महोत्सवासारखे स्वरूप प्राप्त झाले होते. प्रदर्शनाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजक प्रदीप पोमण, प्रकाश पवार, संभाजी गरुड, विलास जगताप यांच्यासह आशिष गिरमे, रवींद्रपंत जगताप, शेखर जगताप, तुषार जगताप, अक्षय उरसळ, निलेश गुरव, संतोष गिरमे, संतोष सोनवणे, डॉ. मनोज शिंदे, बापू मगर, माऊली यादव, तुषार माहूरकर, सचिन कुंजीर, सागर चव्हाण, प्राचार्य नंदकुमार सागर, किशोर शिंदे, चेतन महाजन, अनिल उरवणे, ओंकार दळवी, स्वप्निल शिवरकर, वैभव शिंदे, राजेंद्र जाधव, मनोहर जगताप, अजित जगताप, राजन जगताप यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. तसेच श्री शिवाजी शिक्षण संस्था, संत सोपानकाका सहकारी बँक आणि जिल्हा बँकेच्या कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

> मुख्य आयोजक व माजी आमदार संजय जगताप यांनी सांगितले, "या चार दिवसीय कृषी प्रदर्शनाला शेतकरी आणि नागरिकांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. प्रदर्शनाच्या यशासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे आणि सहभागी शेतकऱ्यांचे मनःपूर्वक आभार."

# मेक इन इंडिया स्वप्न पडद्यावर उलगडणार

- ॲमेझॉन एमएक्स प्लेअरच्या वतीने मेड इन इंडिया – अ टायटन स्टोरी ट्रेलरचे अनावरण, टायटनचा न उलगडलेला वारसा
- सत्य घटनांपासून प्रेरित, मेड इन इंडिया – टायटन कथेचे मोफत स्ट्रीम ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर ३ जूनपासून सुरू




**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

काही कथा कंपन्यांची निर्मिती करतात, काही वारसा घडवतात आणि काही शांतपणे राष्ट्रांना जगाच्या नकाशावर नेऊन ठेवतात. ॲमेझॉन एमएक्स प्लेयर या भारतातील आघाडीच्या विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज त्यांच्या आगामी मालिकेच्या 'मेड इन इंडिया-अ टायटन स्टोरी' या भारताच्या सर्वात प्रतिष्ठित ग्राहक ब्रँडपैकी एकाच्या मागे असलेल्या विलक्षण प्रवासाने प्रेरित अशा आकर्षक कथानकाच्या ट्रेलरचे अनावरण केले. विनय कामत यांच्या "टायटन-इंडियाज मोस्ट सक्सेसफुल कन्झ्युमर ब्रँड" या प्रशंसित पुस्तकावर आधारित या मालिकेत जेआरडी टाटाच्या भूमिकेत नसिरुद्दीन शाह, झेरक्सेस देसाईच्या भूमिकेत जिम सर्भ, त्याशिवाय वैभव तत्ववादी, नमिता दुबे, लक्षवीर सरन आणि कावेरी सेठ यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ही मालिका मेक इन इंडिया उपक्रमाच्या भावनेशी सुसंगत असून तिचा उद्देश भारताला जागतिक रचना आणि उत्पादन केंद्रामध्ये रूपांतरित करण्याचा आहे. करण व्यास लिखित, रॉबी ग्रेवाल दिग्दर्शित आणि अलमाइटी मोशन पिक्चर्स निर्मित, ही सहा भागांची मालिका महत्त्वाकांक्षा, मार्गदर्शन आणि उत्कृष्टतेचा अथक पाठपुरावा यांचा शोध घेते, ज्याने एका अशक्य कल्पनेचे रूपांतर राष्ट्रीय वारशात केले. पूर्व-उदारीकृत भारतात, देश आर्थिक आणि सामाजिक बदलाच्या उंबरठ्यावर उभा असताना, मेड इन इंडियाः अ टायटन स्टोरी'मध्ये दूरदर्शी उद्योजक झेरक्सेस देसाई यांच्या नजरेतून टायटनच्या उल्लेखनीय वाढीचा मागोवा घेतला आहे. ट्रेलरमध्ये महत्त्वाकांक्षा आणि अतूट विश्वासाने चाललेल्या प्रवासाची एक शक्तिशाली झलक दाखवण्यात आली आहे, जिथे भारतीय घड्याळांचा ब्रँड तयार करण्याची एक धाडसी कल्पना हळूहळू खूप मोठ्या गोष्टीत रूपांतरित होते. प्रतिकार वाढत असताना आणि अनिश्चितता वाढत असताना, झेरक्सेस देसाई आणि जेआरडी टाटा त्यांच्या विश्वासावर ठाम आहेत की भारत स्वतःचे काहीतरी निर्माण करू शकतो. घड्याळापासून सुरू झालेल्या कल्पनेतून असा वारसा मिळाला जो देशाच्या अस्मितेचा भाग बनला. ही कथा प्रेक्षकांसमोर आणण्याबाबत आपले विचार मांडताना, ॲमेझॉन एमएक्स प्लेयरचे कंटेंट हेड अमोघ दुसाद म्हणाले, "मेड इन इंडियाः अ टायटन स्टोरी ही एका प्रतिष्ठित ब्रँडच्या प्रवासापेक्षा अधिक आहे, ती महत्त्वाकांक्षा तसेच उद्योजकतेची भावना प्रतिबिंबित करते ज्याने भारताच्या कथेतील एका निर्णायक अध्यायाला आकार दिला.

आत्मनिर्भरता आणि स्वदेशी नवनिर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या 'मेक इन इंडिया' उपक्रमाप्रमाणेच, ही मालिका भारतातच जागतिक दर्जाचे उद्योग उभारणाऱ्या दूरदर्शी लोकांना सन्मानित करते.

## शॉप्सीची नवी झेप; कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित खरेदी मंच तयार

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या हायपरव्हॅल्यू ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्समध्ये गणल्या जाणाऱ्या शॉप्सी बाय फ्लिपकार्टने आज नवीन एआय-पॉवर्ड शॉप्सी ॲप सुरू करत असल्याची घोषणा केली. शॉप्सी प्लॅटफॉर्मचे रूपांतर आता ऑफर्सवर आधारित खरेदीच्या स्थळातून एका आकर्षक, बक्षिसे मिळवून देणाऱ्या गेमिफाइड अनुभवात करण्यात आले आहे. देशातील महानगरे व श्रेणी-२ शहरांत राहणाऱ्या व भारतातील ऑनलाइन खरेदीला नवीन आकार देणाऱ्या तरुण, महत्त्वाकांक्षी, मूल्याबाबत जागरूक अशा भविष्यकाळातील १०० दशलक्ष ग्राहकांना डोळ्यापुढे ठेवून प्लॅटफॉर्मला हे नवीन स्वरूप देण्यात आले आहे. तीन रचनात्मक बाबींमुळे भारतातील ई-कॉमर्स क्षेत्राचे स्वरूप बदलत चालले आहे: पहिला बदल म्हणजे नवीन ग्राहकांच्या वाढीमध्ये श्रेणी २+ शहरांचा वाटा ६५ टक्के आहे; दुसरा बदल म्हणजे जेन झेड या समूहाच्या हवे ते शोधण्याच्या सवयी मुलभूतरित्या वेगळ्या आहेत आणि भारतातील ऑनलाइन ग्राहकांमध्ये या समूहाचा वाटा सुमारे निम्मा आहे; आणि तिसरा मुद्दा म्हणजे डिजिटल प्लॅटफॉर्म्समध्ये विश्वासाचा अभाव अजूनही आहेच. शॉप्सीच्या नवीन ॲपकडे या तिन्ही बाबींवर तोडगा आहे: सामाजिक शोध, व्हिडिओ-लेड उत्पादन अनुभव, पर्सनलायझेशन आणि गेमीफाइड बक्षिसे हे सर्व एकत्र आणून हायपर-कनेक्टेड जेन झेड व पुढील १०० दशलक्ष भारतीय ग्राहकांसाठी अखंडित व अंत:प्रेरणाधारित प्रवास सुरू करणारा प्लॅटफॉर्म शॉप्सीने विकसित केला आहे. ग्राहक जेथे असतील तेथे हा प्लॅटफॉर्म त्यांच्यासाठी उपलब्ध आहे आणि व्यवहारापूर्वीच त्यांचा विश्वास जिंकण्याचे काम करत आहे.


## थोडक्यात पण महत्वाचे




## ओबेन इलेक्ट्रिकच्या महाराष्ट्र विस्ताराला वाढती मागणी

पुणे (आरंभ पर्व) : या भारतातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या संशोधन व विकास (R&D) आधारित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनीने महाराष्ट्रातील विस्ताराला गती दिली आहे. कंपनीच्या नव्या Rorr Evoमोटरसायकलला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला असून, लाँचनंतर अवघ्या १५ दिवसांत २५ हजार बुकिंग झाल्या आहेत. यी पार्श्वभूमीवर कंपनीने आर्थिक वर्ष २०२७ पर्यंत महाराष्ट्रात २५ शोरूम सुरू करण्याची योजना आखली आहे. यामुळे ग्राहकांना इलेक्ट्रिक मोटरसायकल, सेवा सुविधा मिळणार आहेत. कंपनीने पुण्यातील शिवाजीनगर शोरूममध्ये Rorr Evo चे महाराष्ट्रासाठी प्रादेशिक सादरीकरण केले. पुणे हे कंपनीसाठी देशातील सर्वाधिक प्रतिसाद देणाऱ्या बाजारपेठांपैकी एक असल्याचे कंपनीने नमूद केले. सध्या ओबेन इलेक्ट्रिकची महाराष्ट्रात ११ शोरूम्स कार्यरत असून, त्यापैकी पुण्यात वाकड, शिवाजीनगर, अरण्येश्वर आणि चिंचवड येथे चार शोरूम्स आहेत. याशिवाय छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, नागपूर, बार्शी, सोलापूर आणि अहमदपूर येथेही आउटलेट्स आहेत. कंपनी आर्थिक वर्ष २०२७ अखेरपर्यंत महाराष्ट्रात आणखी १४ नवीन शोरूम्स सुरू करणार आहे. उच्च कार्यक्षमतेच्या इलेक्ट्रिक मोटरसायकल्सची वाढती मागणी आणि वेगाने होणारा ईव्ही स्वीकार यामुळे हा विस्तार केला जात आहे.

## आधुनिक व संस्कारयुक्त हॉस्टेलमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू



पुणे (आरंभ पर्व) : शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या जैन समाजातील विद्यार्थ्यांना सुरक्षित, संस्कारित आणि आधुनिक निवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अमृता सुनील गांधी आणि स्मृती श्रुतेश गांधी यांनी एक समाजोपयोगी उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत मागील वर्षी कोथरूड येथे सुमारे ७० विद्यार्थ्यांची क्षमता असलेले अत्याधुनिक जैन बॉईज हॉस्टेल सुरू करण्यात आले असून त्यास विद्यार्थ्यांसह पालकांकडूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे. आगामी शैक्षणिक वर्षासाठी या हॉस्टेलची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून महाराष्ट्र, राजस्थान, गुजरातसह देशभरातील जैन विद्यार्थ्यांना इथे प्रवेश घेता येणार आहे. विद्यार्थ्यांना घरासारखे वातावरण, शिस्तबद्ध जीवनशैली, गुणवत्तापूर्ण भोजन व्यवस्था आणि अभ्यासासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर संस्थापकांनी भर दिला आहे. हॉस्टेलमध्ये एसी रूम्स, वाय-फाय, जिम, इंडोअर गेम्स यांसारख्या सुविधा उपलब्ध असून जैन संस्कारांनी समृद्ध सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून शांत आणि प्रेरणादायी परिसराची उभारणी करण्यात आली आहे.



## अमेझॉनतर्फे फायर टीव्ही स्टिक एचडी लॉन्च

पुणे (आरंभ पर्व) : अमेझॉनने भारतीय बाजारपेठेत नवी 'फायर टीव्ही स्टिक एचडी'सादर करत घरगुती मनोरंजन क्षेत्रातील स्पर्धा अधिक तीव्र केली आहे. आधीच्या पिढीच्या तुलनेत ही नवी साधनसामग्री सरासरी ३० टक्के अधिक वेगाने कार्य करत असल्याचा दावा कंपनीने केला असून ग्राहकांना अधिक जलद, अखंड आणि सुलभ चित्रप्रवाहाचा अनुभव देण्यावर भर देण्यात आला आहे. पूर्ण एचडी दर्जातील चित्रप्रवाह, अधिक स्थिर बिनतारी जाळे जोडणी, वेगवान प्रतिसाद क्षमता आणि नव्या स्वरूपातील वापर प्रणाली ही या उत्पादनाची प्रमुख वैशिष्ट्ये मानली जात आहेत. कंपनीच्या मते, ही आतापर्यंतची सर्वात सडपातळ आणि हलकी 'फायर टीव्ही स्टिक' असून ती थेट दूरचित्रवाणी संचाच्या 'यूएसबी' जोडणीद्वारे चालवता येते. त्यामुळे स्वतंत्र विद्युत जोडणी किंवा अतिरिक्त तारा वापरण्याची गरज राहत नाही. आकाराने लहान असल्याने ती प्रवासादरम्यान सहज बरोबर नेता येणार असून ग्राहकांना कुठेही त्यांच्या आवडत्या मालिका, चित्रपट किंवा थेट कार्यक्रमांचा आनंद घेता येणार आहे. नव्या प्रणालीमध्ये चित्रपट, मालिका, थेट कार्यक्रम आणि विनामूल्य सामग्रीसाठी स्वतंत्र विभाग देण्यात आले आहेत. त्यामुळे ग्राहकांना हवे असलेले मनोरंजन कमी वेळेत शोधणे शक्य होणार आहे. याशिवाय, घरातील वातानुकूलन यंत्रणा, पंखे, दिवे आणि इतर स्मार्ट उपकरणांचे नियंत्रणही या प्रणालीद्वारे करता येणार आहे. आवाजाद्वारे आदेश देण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली असून त्यामुळे कार्यक्रम शोधणे आणि सुरू करणे अधिक सोपे होणार आहे. अमेझॉनने यंदाच्या सुरुवातीला भारतात 'फायर टीव्ही'साठी नव्या स्वरूपातील भ्रमणध्वनी अनुप्रयोगही सादर केला होता. या माध्यमातून ग्राहकांना भ्रमणध्वनीवरूनच कार्यक्रम शोधणे, पाहण्याची यादी तयार करणे आणि दूरचित्रवाणीवर थेट कार्यक्रम सुरू करणे शक्य झाले आहे.

## विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये चमकदार कामगिरी

पुणे (आरंभ पर्व) : विज्ञान ऑलिम्पियाड फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या ऑलिम्पियाड स्पर्धांपैकी एक असलेल्या एसओएफ ऑलिम्पियाड २०२५-२६ मध्ये पुण्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. विविध विषयांच्या स्पर्धांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवत विद्यार्थ्यांनी शहराचा नावलौकिक वाढविला आहे. भारती विद्यापीठ रवींद्रनाथ टागोर उत्कृष्टता विद्यालयातील इयत्ता दहावीचा विद्यार्थी आर्य वैभव कुलकर्णी याने आंतरराष्ट्रीय इंग्रजी ऑलिम्पियाडमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले. तसेच एसएनबीपी आंतरराष्ट्रीय विद्यालयातील इयत्ता अकरावीचा विद्यार्थी देव सक्सेना याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विशेष यश संपादन केले. विबग्योर उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सहावीचा विद्यार्थी अर्जुन डोंगस्वार याने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले, तर अक्षरा आंतरराष्ट्रीय विद्यालयातील इयत्ता आठवीचा विद्यार्थी अरमान गुहा याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये विशेष यश मिळवले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या १२ वर्षांची पूर्तता भारत जागतिक शक्ती म्हणून उदयास




या विशेष संग्राह्य अंकामध्ये अखंड भारत, अंत्योदय, सुरक्षित भारत, युवा भारत, मातृप्रधान भारत अशा विषयांपासून विज्ञान, उद्योग आणि विकसित भारत २०४७ यावर विशेष प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. भारताने जागतिक स्तरावर निर्माण केलेला प्रभाव, सीमांवर शत्रूला दिलेले सडेतोड उत्तर आणि जगातील संकटसमयी मानवतेसाठी धावून जाणारा संवेदनशील भारत यांचेही या अंकात दस्तावेजीकरण करण्यात आले आहे. "राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती" हा केवळ स्मरणिका नसून नव्या भारताच्या परिवर्तनाचा साक्षीदार ठरणारा ऐतिहासिक दस्तावेज असल्याचे रविंद्र चव्हाण यांनी नमूद केले.

"काही व्यक्ती अध्यात्मातून तपस्या करतात, काही कला आणि साहित्याच्या माध्यमातून समाजासाठी जगतात; पण मोदीजींनी स्वतःला राष्ट्रसेवेसाठी समर्पित केले आहे. म्हणूनच ते राष्ट्र तपस्वी आहेत," असे सांगत मोदीजींच्या कार्याची पुस्तकरूपी माहिती जनतेला संकलित स्वरूपात द्यावी, या उद्देशाने "राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती" हा विशेष संग्राह्य अंक प्रकाशित करण्यात आल्याचेही प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशाचा स्वाभिमान जागा करून परिवर्तन घडवलं जाऊ शकते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी त्यांच्या 12 वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याने दाखवून दिले आहे. फक्त अनुदान घेणे ही वृत्ती न बाळगता देशाला जगामध्ये स्वाभिमानाने उभा असलेला भारत देश बनवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. एवढेच नाही तर देशात मेक इन इंडिया ही चळवळ राबवून मेक फॉर वर्ल्ड च्या दिशेने देशाची वाटचाल सुरू करण्यामागे मोलाचे योगदान दिले आहे. ज्या भारताकडे पूर्वी एक याचक राष्ट्र म्हणून पाहिले जायचे, त्याला जागतिक महाशक्ती बनविण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केले आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत काढले. देशाचे लाडके पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी २६ मे २०२६ रोजी पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीची १२ वर्षे पूर्ण करत आहेत. मोदीजींच्या यशस्वी, दूरदर्शी आणि परिवर्तनकारी राष्ट्रसेवेचे एक तप हे भारतासाठी आणि समस्त भारतीयांसाठी वरदान ठरले आहे. या ऐतिहासिक पर्वानिमित्त 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' या विशेष संग्राह्य अंकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आज मुंबईतील प्रभादेवी स्थित रविंद्र नाट्यमंदिर येथे करण्यात आले, या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी त्यांच्या सोबत भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम, मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय कुटे, आमदार सुनील राणे उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, मोदींजींनी मागील 12 वर्षांत केलेले कार्य खूप मोठे आहे. एका पुस्तकात ते कार्य मांडणे खूप कठीण काम आहे. देशातील तळागाळातील शेवटच्या माणसाला सरकारच्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी मोदींजींनी सतत प्रयत्न केले. हर घर शौचालय, उज्वला गॅस योजना यांसारख्या योजना त्यांनी राबवल्या. सरकारच्या अनुदानावर जनतेला न ठेवता गरीब केंद्रित अजेंडा त्यांनी राबवला. त्याचाच परिणाम म्हणून मागील 10 वर्षांत 25 कोटी जनतेला गरिबीतून बाहेर काढण्यात सरकारला यश आले. भारताचा GDP 2013-14 मध्ये 103 लाख कोटी होता तो 2025-26 मध्ये 357 लाख कोटींपर्यंत म्हणजेच तिप्पट वाढवला. महाराष्ट्राचा GDP 2013-14 मध्ये 13 लाख कोटी इतका होता तो 2025-26 पर्यंत 54 लाख कोटी इतका वाढवला. हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. पंतप्रधान मोदींजींचे 12 वर्षांत केलेला देशाचा विकास हा फक्त घोषणांनी झालेला नाही, तर त्यामागे त्यांची विकासाभिमुख नियोजनबद्ध रणनीती हे मुख्य कारण आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या बारा वर्षांत भारताने केवळ विकास केला नाही, तर जगासमोर एका नव्या राष्ट्रशक्तीचा आदर्श उभा केला आहे. आजचा भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करणारा, डिजिटल तंत्रज्ञानाने सक्षम झालेला, उद्योगशील आणि नारीशक्तीला केंद्रस्थानी ठेवणारा समर्थ राष्ट्र म्हणून जगभरात ओळखला जात आहे, असे गौरवोद्गार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी "राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती"या विशेष संग्राह्य अंकाच्या प्रकाशन सोहळ्यात काढले. "राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती" म्हणजे खरंतर देशाच्या जनतेने अनुभवलेला परिवर्तनाचा इतिहास आहे, असे सांगत रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, गेल्या एका तपामध्ये सामान्य माणसाच्या आयुष्यात घडलेला बदल प्रत्येक भारतीयाने अनुभवला आहे. शेतकरी, कामगार, गरीब, वंचित आणि उपेक्षितांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी व्यवस्था मोदी सरकारने निर्माण केली.

पारदर्शक शासनपद्धतीमुळे सरकारी योजनांचा लाभ थेट शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला. देशातील गरीबांच्या घरात उजेड, महिलांच्या आयुष्यात सन्मान, युवकांच्या हातात संधी आणि सामान्य नागरिकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. "एक भारत, अखंड भारत"ते "विकसित भारत"या प्रवासातील परिवर्तनाची १२ विषयांवरील तथ्यपूर्ण मांडणी या विशेष अंकातून करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

## दुर्मिळ चयापचय विकाराचे निदान व उपचार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमधील बहुविभागीय तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने चयापचय विकार या दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या आजाराने ग्रस्त असलेल्या एका बालरुग्णावर यशस्वी उपचार केले. हा दुर्मिळ आजार गिलियन-बॅरे सिंड्रोम (जीबीएस) सारखा दिसत होता. यामुळे मज्जासंस्थेशी संबंधित (न्यूरोलॉजिकल) लक्षणांमागील लपलेली कारणे शोधण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. पूर्णपणे निरोगी आणि सामान्य विकास झालेल्या ४ वर्षे ९ महिन्यांच्या एका मुलामध्ये काही दिवसांपूर्वी ताप, खोकला आणि सर्दीची लक्षणे दिसून आली. त्यानंतर अल्पकाळ झटके आल्यानंतर त्याला आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले. रुग्णालयात दाखल होताना तो शुद्धीत होता. मात्र डॉक्टरांनी त्याचा रक्तदाब अत्यंत जास्त असल्याचे आणि शरीरातील प्रतिक्षिप्त क्रिया अनुपस्थित असल्याचे लक्षात घेतले. त्यानंतर त्याला बाल अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. पुढील २४ तासांत त्या मुलामध्ये हात-पायांचा अशक्तपणा वाढला आणि श्वास घेण्यास अडचण निर्माण झाली.

## सराईत गुन्हेगाराला तीन वर्षे कारावास

- चऱ्होली बुद्रुक घरफोडी प्रकरणी खेड न्यायालयाचा निकाल



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील आळंदी पोलिस ठाण्याच्या हद्दीत चऱ्होली बुद्रुक येथे घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला येथील प्रथम न्यायदंडाधिकारी एस. व्ही. उतकर यांनी तीन वर्षे साधा कारावास आणि २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. हर्षद गुलाब पवार (वय ३१, रा. गुलाबनगर, घोटावडे फाटा, ता. मुळशी) असे या गुन्ह्यातील आरोपीचे नाव आहे.

या खटल्याची माहिती अशी, चऱ्होली बुद्रुक (ता. खेड) गावच्या हद्दीत फिर्यादी कल्पना सुभाष पारख या २०२३ साली २४ ते २७ डिसेंबर या कालावधीत कुटुंबासह बाहेरगावी लग्नकार्यासाठी गेल्या होत्या. घरी परत आल्यानंतर त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरातील कपाटातील सोने, चांदीचे दागिने व रोख रक्कम असा ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले.

याप्रकरणी त्यांनी आळंदी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल केला होता. त्याचा तपास तत्कालीन पोलिस उपनिरीक्षक अजय लोहकरे व त्यांच्या पथकाने केला-तपासाअंती पोलिसांनी आरोपी हर्षद पवार याला १८ मार्च २०२५ रोजी अटक केली होती. हा खटला राजगुरुनगर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी उतकर यांच्या न्यायालयात सुरू होता. या खटल्यात सरकारी पक्षाच्या वतीने सहाय्यक सरकारी अभियोक्ता ए. एस. चव्हाण यांनी चार साक्षीदार तपासले. तसेच पवार याचा इतर चार गुन्ह्यात सहभाग असल्याचाही युक्तिवाद करण्यात आला. याप्रकरणी न्यायालयाने त्याला दोषी धरून तीन वर्षे साधा कारावास व १० हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. या खटल्यात हवालदार आर. एस. मोहिते, योगिता गावडे यांनी सरकार पक्षास मदत केली.

### सुभाष बाबुराव कुल महाविद्यालयातील एन.सी.सी.चे

## १८ कॅडेट 'सीएटीसी-७०७' शिबिरासाठी रवाना




**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

नेताजी शिक्षण संस्थेच्या सुभाष बाबुराव कुल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केडगाव येथील राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) विभागातील ९ विद्यार्थी व ९ विद्यार्थिनी अशा एकूण १८ कॅडेटची ५९ महाराष्ट्र बटालियन, पुणे यांच्या वतीने आयोजित संयुक्त वार्षिक प्रशिक्षण शिबिर 'सीएटीसी-७०७'साठी निवड करण्यात आली आहे. हे शिबिर पुण्यातील निगडी येथील ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय येथे २५ मे ते ३ जून २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण आणि देशसेवेची भावना विकसित करणे तसेच भविष्यात संरक्षण दलात प्रवेशासाठी आवश्यक प्राथमिक प्रशिक्षण देणे हा शिबिराचा प्रमुख उद्देश आहे.

या शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासाला चालना मिळणार असून त्यांच्यात आत्मविश्वास व संघभावना वृद्धिंगत होणार असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले.

शिबिरासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष सुनील निंबाळकर, सचिव धनाजी शेळके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार जाधव, डॉ. अशोक दिवेकर, डॉ. विशाल गायकवाड तसेच डॉ. सुनिता बनकर यांनी शुभेच्छा देत प्रोत्साहन दिले.

महाविद्यालयाचे एन.सी.सी. अधिकारी व अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. श्यामराव वासनीकर यांनी विद्यार्थ्यांची शिबिरासाठी आवश्यक तयारी करून घेतली असून ते देखील या शिबिरात महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

## फ्लिपकार्टतर्फे विद्यार्थ्यांसाठी 'बॅक टू कॅम्पस २०२६' विशेष विक्री उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फ्लिपकार्टने विद्यार्थ्यांसाठी 'बॅक टू कॅम्पस २०२६' विशेष विक्री उपक्रम जाहीर केला असून, २२ मे ते २८ मेदरम्यान विविध तंत्रज्ञान साधनांवर आकर्षक सवलती दिल्या जाणार आहेत. या उपक्रमात वहनक्षम संगणक, फलक संगणक, ध्वनी उपकरणे, बुद्धिमान घड्याळे आणि परिधान करता येणाऱ्या बुद्धिमान साधनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षण, सर्जनशीलता आणि दैनंदिन वापरासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता-सक्षम साधनांची मागणी वाढत असल्याने, ही साधने अधिक परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यावर कंपनीने भर दिला आहे. या विक्री उपक्रमात आसुस, सॅमसंग, लेनोव्हो, मोटोरोला, एचपी, डेल, एसर, ॲपल, वनप्लस, सोनी, जेबीएल, बोट, नॉईज आणि रिअलमी आदी नामांकित कंपन्यांच्या उत्पादनांवर सवलती देण्यात येत आहेत. ॲपल मॅकबुक एअर एम५, सॅमसंग गॅलेक्सी बुक ६, आसुस विवोबुक १४, लेनोव्हो लीजन प्रो ५, वनप्लस पॅड ४ आणि एसर आयकोनिया टॅब ५जी यांसारखी नव्या पिढीची उपकरणेही या उपक्रमात उपलब्ध आहेत. फ्लिपकार्टच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे उपाध्यक्ष सुजित अगाशे म्हणाले, "आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित युगात तंत्रज्ञान हे विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी महत्त्वाचे साधन बनले आहे.

# रस्त्यात सापडलेले सोन्याचे मंगळसूत्र महिलेला केले परत



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

आजच्या युगात जिथे प्रामाणिकपणा दुर्मिळ होत चालला आहे, तिथेच एका सुजाण नागरिकाच्या प्रामाणिकपणामुळे आणि 'एस हॉस्पिटल 'एरंडवणे येथील कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे एका महिलेचे हरवलेले लाखो रुपयांचा दागिना तिला सुखरूप परत मिळालाआहे. रस्त्यात सापडलेले अंदाजे १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र संबंधित महिलेला परत करून समाजात अजूनही प्रामाणिकपणा जिवंत असल्याचा प्रत्यय आणून दिला आहे. मागील आठवड्यात एस हॉस्पिटलच्या बाहेरील रस्त्यावर एका महिला रूग्णाचे अंदाजे १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र हरवले होते. यानंतर या महिलेने हॉस्पिटलमध्ये येऊन कर्मचाऱ्यांना याबद्दल सांगितले. हॉस्पिटल स्टाफने वेळ न दवडता त्या दिवशी तिथे आलेले रुग्ण, नातेवाईक आणि व्हिजिटर्स यांच्याकडे चौकशी सुरू केली. दरम्यान, त्या दिवशी हॉस्पिटलमध्ये व्हिजिटसाठी आलेले मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह श्री.गणेश वाघमारे यांना रस्त्याने येताना हे मंगळसूत्र सापडले होते. हॉस्पिटलमध्ये याबाबत चौकशी सुरू असल्याचे त्यांना त्यांचे मित्र अजय कापसे यांचेकडून समजताच, त्यांनी हॉस्पिटल प्रशासनाला फोन करून दागिना आपल्याकडे सुरक्षित असल्याचे कळवले.

यानंतर हॉस्पिटल प्रशासनाने संबंधित महिला रुग्णाच्या पतीला बोलावून घेतले आणि सर्वांसमक्ष सोन्याचे मंगळसूत्र त्यांना सुखरूप परत केले.

### सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव

आजच्या काळात सोन्याचे भाव गगनाला भिडलेले असताना, रस्त्यात सापडलेले लाखो रुपयांचे मंगळसूत्र स्वतःहून परत करणाऱ्या श्री. वाघमारे यांच्या प्रामाणिकपणाचे आणि रुग्णाप्रती दाखवलेल्या संवेदनशीलतेबद्दल 'एस हॉस्पिटल'च्या संपूर्ण टीमचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.